**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक २२ नोव्हेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जागतिक विकासाच्या निकषांवर सखोल पुनर्विचार करण्याचे दक्षिण आफ्रिकेतील जोहान्सबर्ग येथे जी२० नेत्यांच्या शिखर परिषदेत केले आवाहन.**
2. **शेतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून शेतीचे भविष्य बदलू शकते. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचं 'संत्रा: स्पेन, इस्रायल... व्हाया विदर्भ' या पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी प्रतिपादन.**
3. **मतदार यादीसंदर्भातील तक्रारी संबंधित महानगरपालिका आयुक्तांकडे दाखल करण्याचे राज्य निवडणुक आयोगाचे आवाहन.**
4. **भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातला दुस-या कसोटी क्रिकेट सामन्यात पहिल्या डावात दिवसअखेर दक्षिण आफ्रिकेच्या 6 बाद 247 धावा.**

---

जी ट्वेंटी-

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जागतिक विकासाच्या निकषांवर सखोल पुनर्विचार करण्याच आवाहन आज दक्षिण आफ्रिकेतील जोहान्सबर्ग येथे झालेल्या जी २० नेत्यांच्या शिखर परिषदेच्या पहिल्या सत्राला संबोधित करताना, केले. यावेळी बोलतांना आफ्रिकेन पहिल्यांदाच जी२० शिखर परिषदेच आयोजन केल असल्यान, मोदी म्हणाले की, जागतिक विकासाच्या निकषांवर पुनर्विचार करण्याची आणि समावेशक, शाश्वत अशा दोन्ही प्रकारच्या विकासाला प्राधान्य देण्याची ही योग्य वेळ आहे. त्यांनी पुढे सांगितल की, भारताची संस्कृती विषयक मूल्ये, विशेषतः एकात्मिक मानवतावादाचे तत्व, पुढे जाण्याचा अर्थपूर्ण मार्ग देतात. तीन दिवस चालणाऱ्या या शिखर परिषदेत, प्रधानमंत्री मोदी सर्व सत्रांना उपस्थित राहतील आणि जागतिक दक्षिण चिंता, शाश्वत विकास, हवामान कृती, ऊर्जा संक्रमण आणि जागतिक प्रशासनातील सुधारणांसह भारताच्या प्रमुख प्राधान्यक्रमांचं सादरीकरण करतील.

---

गडकरी ॲग्रोव्हिजन

शेतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून शेतीच भविष्य बदलू शकते. आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या मदतीन बारामती येथे क्लस्टरच्या स्वरूपात शेतकऱ्यांनी उसाची विक्रमी लागवड केली. विदर्भात देखील लहान शेतकऱ्यांना किफायतशीर दरात हे तंत्रज्ञान उपलब्ध होऊ शकत. त्यांना देखील विक्रमी उत्पादन घेण्याची संधी आहे. अस प्रतिपादन केंद्रीय मंत्री तसच ॲग्रो व्हिजन या कृषी प्रदर्शनाचे मुख्य प्रवर्तक नितीन गडकरी यांनी आज केलं .नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या 'संत्रा: स्पेन, इस्रायल... व्हाया विदर्भ' या पुस्तकाच आज विमोचन करण्यात आलं त्यावेळी प्रसार माध्यमांशी ते बोलत होते........

***(होल्ड बाईट - केंद्रीय मंत्री नितीन गडकरी- २७ सेकंद)***

***बेसिकली इसमें हमारे खेत में पहले हम जमीन के पूरा हेल्थ सॉइल कार्ड तैयार करते हैं, फिर उसके आधार पर एक वेदर स्टेशन लगाते हैं, जो सैटेलाइट से लिंक होता है और उसमें मॉइस्चर गिनने के लिए भी तो पानी का यूज़ 50% कम होता है। जो जरूरी नहीं वो फर्टिलाइज़र हम देते है। वो कहते है, अभी ये नहीं इसकी जरूरत है। प्लांट में भी टेक्नोलॉजी का उपयोग करके उत्पादकता बढ़ाने के लिए AI ये एक आया इस साल का, हमारा अग्रोव्हिजन का मेन थीम है, AI ये हमारी रही बहुत अच्छा रिस्पॉन्स किसान से मिला।***

काही महिन्यांपूर्वी गडकरी यांच्या नेतृत्वात विदर्भातील ४० संत्रा उत्पादकांची टीम स्पेन येथील व्हॅलेन्शिया संत्रा लागवडीचा अभ्यास करण्यासाठी गेली होती. व्हॅलेन्शिया येथील संत्रा लागवडीची पद्धत, येथील नर्सरी, पॅकेजिंग, ब्रँडिंग, मार्केटिंग इतर अनेक गोष्टींची इत्तंभुत माहिती स्पेनवरून आल्यानंतर ॲग्रोव्हिजन फाउंडेशनच्या वतीन संत्रा उत्पादकांसाठी एका नागपुरात कार्यशाळेच्या माध्यमातून मांडण्यात आली. या माहितीचे संकलन या पुस्तकात आहे. 21 ते 24 नोव्हेंबर दरम्यान ॲग्रो व्हिजन येथील कृषी प्रदर्शनामध्ये विविध कार्यशाळांचे आयोजन करण्यात येत असून या कार्यशाळांना विदर्भातील तसच संपूर्ण राज्यातील शेतकऱ्यांचा सक्रिय सहभाग आणि प्रतिसाद मिळत आहे. ॲग्रोव्हिजनच्या दुस-या दिवशी 'ऊस लागवड' कार्यशाळेला आज गड्करींनी संबोधित केले. शेतक-यांनी मातीमध्ये ऑरगॅनिक कार्बनसह कोणती पोषक द्रव्ये आहे, हे तपासून घेत 'सॉईल हेल्थ कार्ड' तयार कराव, अस सांगताना नितीन गडकरी यांनी एआय तंत्रज्ञानाचा वापर करून तुर, संत्रा, कापूस अशा उत्पादनाच एकरी उत्पादन वाढवू शकतो. अस सांगितल.

---

श्रम संहिता

केंद्र शासनाच्या वतीन देशातील 40 कोटी कामगारांना केंद्रस्थानी ठेवून प्रत्येक कामगारांचा सन्मान करणारी कामगार संहिता लागू केली असून या ऐतिहासिक निर्णयाच सर्व स्तरातून स्वागत होत आहे. सर्व कामगारांना वेळेवर किमान वेतनाची हमी,तरुणांसाठी नियुक्ती पत्रांची हमी, महिलांसाठी समान वेतन आणि आदराची हमी या निर्णयामुळे प्राप्त झाली असून,  कामगारांच्या सामाजिक सुरक्षेची हमी मिळणार असल्यान प्रत्येक कामगारांसाठी हा निर्णय महत्त्वपूर्ण असल्याची भावना नागपूरातील एका कामगार नेत्यान व्यक्त केली आहे.....

**(होल्ड बाईट - 34 सेकंद)**

**याच्यात प्रत्येकाला किमान वेतन, प्रत्येकाला नियुक्ती पत्र, महिलांना सामान वेतन आणि महिलांना नाईट पाळी करायची सुद्धा परवानगी देण्यात आली आहे. प्रत्येकाला १ वर्षात आता ग्रज्युएटी मिळणार आहे फिक्स एम्प्लॉईजलाही एका वर्षात आपल्याला ग्रज्युएटीचा अनुदान देण्यात येणार आहे. तसच गिग वर्करला सुद्धा पी.एफ, ईपीएस इन्श्युरन्ससारखे लाभ मिळणार आहे. म्हणजे सत्यमेव जयते हे एक आपलं ब्रीदवाक्य होतं पण आज नरेंद्रभाई मोदीजी श्रमेव जयते हे ब्रीदवाक्य बनलेला कामगारांना जो न्याय दिलेला आहे. त्याबद्दल आदरणीय नरेंद्रभाई मोदी यांचे सर्वांचे अभिनंदन.**

दरम्यान, या सुधारणा भारतीय कामगारांच्या कल्याणात वाढ करतील, औद्योगिक क्षेत्र अधिक सक्षम करतील आणि आत्मनिर्भर भारताच्या दिशेन ठोस पाऊल टाकतील.

---

इफ्फी

गोव्यात पणजी इथं सुरू असलेल्या ५६ व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा आजच्या तिसऱ्या दिवशी, चित्रपट रसिकांना देशोदेशीच्या चित्रपटांची मेजवानी मिळणार आहे. व्हॅलेंटिना बेर्तिनी आणि निकोल बेर्तिनी यांचा 'मॉस्किटोज' हा इटालियन चित्रपट, जफार पनाही यांचा 'इट वॉज जस्ट ॲन ॲक्सिडेंट', सूर्या बालकृष्णन यांचा 'दीपा दीदी' आणि देबांकर बोर्गोहाईन यांचा 'सिकार' हा आसामी चित्रपट यासह इतर अनेक चित्रपट आज 'इफ्फी'मध्ये दाखवले जात आहेत.नारी शक्तीचं स्थान अधोरेखित करण्यासाठी यंदा पहिल्यांदाच ५० महिला दिग्दर्शकांचे चित्रपट प्रदर्शित होत असून आज सिंपल दुगार यांचा 'लोकमाता देवी अहिल्याबाई' हा चित्रपट प्रेक्षकांना पाहता येईल. याशिवाय, प्रसिद्ध निर्माते विधू विनोद चोप्रा यांचा 'मास्टरक्लास', बर्लिन आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या संचालक ट्रिशिया

टटल यांच्याशी 'इफ्फी'चे संचालक शेखर कपूर यांचा संवाद, यासह विविध सत्रं आणि कार्यक्रम इथं होत आहेत.

---------------------------------------------------------------

हरकती

महानगरपालिका निवडणुकांसाठी मतदार याद्यांचे प्रभागनिहाय विभाजन संबंधित महानगरपालिका आयुक्तांच्या स्तरावर करण्यात आले असून, त्याबाबत हरकती आणि सूचना किंवा काही तक्रारी असल्यास येत्या 27 नोव्हेंबर पर्यंत संबंधित तक्रारी महानगरपालिकेत दाखल कराव्यात, अस आवाहन राज्य निवडणूक आयोगान केल आहे. राज्यातील 29 महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठी मतदार याद्यांकरिता 1 जुलै 2025 हा अधिसूचित दिनांक निश्चित केला असून, त्या दिवशी अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार याद्या या निवडणुकांसाठी वापरण्यात येणार आहेत. या मूळ मतदार याद्या भारत निवडणूक आयोगान तयार केल्या आहेत. त्यांचे प्रभागनिहाय विभाजन संबंधित महानगरपालिका स्तरावर महानगरपालिका आयुक्तांच्या देखरेखीखाली करण्यात आले आहे. त्यानुसार 20 नोव्हेंबर 2025 रोजी संबंधित महानगरपालिकेच्या ठिकाणी प्रभागनिहाय प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. त्यातील आपले नाव mahasecvoterlist.in/ObjectionOnClick/ या संकेतस्थळावर शोधता येईल. त्यावर 27 नोव्हेंबर 2025 पर्यंत हरकती आणि सूचना दाखल करता येतील.

---------------------------------------------------------------

ब्लेंडेड एमबीए अभ्यासक्रम

नागपुरच्या मिहानस्थित 'भारतीय प्रबंध संस्थान' तर्फे व्यवसाय किंवा नोकरी करत असलेल्या अनुभवी लोकांसाठी वैशिष्ठ्यपूर्ण अश्या 'ब्लेंडेड एमबीए' अभ्यासक्रमाची सुरुवात आज करण्यात आली. आय. आय. एम. नागपूरचे संचालक प्रा.भिमराया मेत्री यावेळी अध्यक्षस्थानी होते. 'ब्लेंडेड एमबीएच्या' या पहिल्याच तुकडीसाठी केवळ भारतातूनच नव्हे, तर इतर अनेक देशांमधून तब्बल ३७३ अर्ज प्राप्त झाले होते. यापैकी ८३ विद्यार्थ्यांची निवड केली गेली आहे. यात भारताच्या २० हून अधिक राज्यांतून आलेल्या तसच परदेशातील काही विद्यार्थ्यांचा देखील समावेश आहे.

---------------------------------------------------------------

कसोटी सामना

क्रिकेट! गुवाहाटीतील बरसापारा क्रिकेट स्टेडियमवर आज संध्याकाळी भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातला दुसरा कसोटी क्रिकेट सामन्याच्या पहिल्या दिवशी

दक्षिण आफ्रिकेनं पहिल्या डावात 6 बाद 247 धावा केल्या होत्या. यजमान संघाकडून कुलदीप यादवन तीन बळी घेतले. तर, जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज आणि रवींद्र जडेजा यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला. नियमित कर्णधार शुभमन गिल मानेच्या दुखापतीमुळे दुसऱ्या कसोटीतून बाहेर पडल्यान यष्टीरक्षक-फलंदाज ऋषभ पंत या सामन्यात टीम इंडियाच नेतृत्व करत आहे. कोलकात्यातील ईडन गार्डन्स येथे झालेल्या दोन सामन्यांच्या मालिकेतील पहिल्या कसोटीत दक्षिण आफ्रिकेन भारताचा ३० धावांनी पराभव केला होता.

---------------------------------------------------------------

हवामान

हवामान! विदर्भात सर्वत्र हवामान कोरडे राहणार असून , कमाल आणि किमान तापमानात फारसा बदल संभवत नसल्याचा अंदाज हवामान खात्याकडून वर्तवण्यात आला आहे. आज वाशिम इथ ११ पूर्णांक ८ अंश सेल्सिअस इतक्या किमान तपमानाची नोंद झाली असून भंडारा जिल्ह्यात १२ तर नागपूर इथे १३ पूर्णांक ५ अंश इतक किमान तापमान नोंदवण्यात आलं आहे.

---------------------------------------------------------------